# अत्याधुनिक शस्त्रक्रिया विभागाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**नाशिक ।** येथील सुशील आय केअर–डॉ.अग्रवालस् आय हॉस्पिटलच्या अत्याधुनिक शस्त्रक्रिया विभागाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकतेच झाले. पहिला वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

यावेळी राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापनमंत्री गिरीश महाजन, आमदार सीमा हिरे यांसह विविध मान्यवर उपस्थित होते. उत्कृष्ट नेत्र उपचार आणि रुग्णसेवेच्या बांधिलकीसाठी प्रसिद्ध असलेले सुशील आय केअर हे डॉ. अग्रवालस् आय हॉस्पिटलचा एक भाग हे नाशिकमधील एक अग्रगण्य नेत्रसेवा केंद्र गेल्या ३८ वर्षांपासून कार्यन्वित आहे. दोन अत्याधुनिक केंद्रांच्या माध्यमातून मोतीबिंदू शस्त्रक्रिया, कॉर्नियल ट्रान्सप्लांट, लॅसिक, रेटीना आणि ग्लॉकोमा उपचार आदी प्रगत नेत्रसेवा प्रदान केली जाते आहे. प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. शरद पाटील आणि डॉ. सुशील पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुशील आय केअरच्या माध्यमातून सर्वसमावेशक दृष्टिकोन ठेवताना आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने दर्जेदार नेत्रसेवा दिली जात आहे.




पान १ वरून ....

## बंगळुरूत चेंगराचेंगरी, ११ बळी

विजयी परेड नसल्याने सर्व चाहत्यांनी थेट स्टेडियमबाहेर गर्दी केली. चिन्नास्वामी स्टेडियमची आसन क्षमता ३० ते ३२ हजार इतकी आहे. पण स्टेडियमबाहेर लाखोंची गर्दी झाली. यावेळी गर्दीला आवरणे सुरक्षारक्षकांनाही कठीण होऊन बसले. गर्दी इतकी होती चक्क स्टेडियमबाहेरील वाहनांवर लोक चढले. वाहनांचेही मोठें नुकसान झाले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, चेंगराचेंगरीतील मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. गर्दी नियंत्रित करण्यासाठी पोलिसांनी आधीच काही सूचना जारी केल्या होत्या. लोकांना मेट्रो आणि सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्याचा सल्ला देण्यात आला होता. असे असूनही, स्टेडियमभोवती मोठी गर्दी जमली, ज्यामुळे ही घटना घडली आहे. बेंगळुरू पोलीस आणि प्रशासनाने जखमींना तात्काळ वैद्यकीय मदत पुरवली आहे.

# नाराजीनाट्याचा दुसरा अंक... बडगुजरांची हकालपट्टी

संपणार असे वक्तव्य केल्याने राजकीय भूकंप झाला होता. या सर्व पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गटाची भूमिका मांडण्यासाठी काल (दि.४) शालिमार येथील सेना भवनात स्थानिक नेत्यांनी पत्रकार परिषद घेतली.याचवेळी बडगुजर यांची हकालपट्टी करण्यात आल्याची घोषणा करण्यात आली. मंगळवारी (दि.३) बडगुजर यांनी आपण शिवसेना पक्षात नाराज असल्याचे सांगितले होते. त्यांच्याकडे उपनेते पदाची जबाबदारी होती. तसेच मागील काही काळापासून नाशिकमधील पक्षाचा महत्वाचा चेहरा होते. मात्र, विधानसभा निवडणुकीनंतर ते भाजपमध्ये चाचपणी करीत असल्याची चर्चा सुरु झाली होती. त्यातच त्यांच्या मुलावर पोलिसांनी मोक्का अंतर्गत कारवाई केली होती, नंतर मोक्का काढण्यात आल्यामुळे दिलासा मिळाला होता. म्हणून संशय वाढत गेल्याने पक्षाने त्यांच्यावरील जिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी काढून डी. जी. सूर्यवंशी यांना दिली. यावेळी देखील बडगुजर नाराज झाले होते. मला विश्वासात न घेता निर्णय झाल्याचे सांगितले होते. पत्रकार परिषदेत ठाकरे गटाचे नाशिकचे जिल्हाप्रमुख डी.जी. सूर्यवंशी, महानगरप्रमुख विलास शिंदे, खा. राजाभाऊ वाजे, उपनेते सुनील बागुल, उपनेते दत्ता गायकवाड, माजी महापौर विनायक पांडे, माजी आमदार वसंत गिते, जिल्हा संघटक मसुद जिलानी, भय्या मणियार, ऋशी वर्मा, माजी उपमहापौर प्रथमेश गिते, निलोफर शेख आदी उपस्थित होते.

### शिवसेना संपणार नाही : सूर्यवंशी

गेली २७ वर्ष हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेचा हात धरून भारतीय जनता पक्ष महाराष्ट्रात वाढला, मात्र भाजपचे मंत्री नाशिकला येऊन बडबडले की शिवसेना संपणार, शिवसेना कधीही संपणार नाही. नाशिक शहर, जिल्ह्याचे सर्व प्रमुख पदाधिकारीसोबत असून कुणीही नाराज नसल्याचे जिल्हाप्रमुख डी.जी. सूर्यवंशी यांनी सांगितले. नाशिक जिल्ह्यात चार व कुंभमेळा मंत्री असे पाच मंत्री असले तरी सरकार पालकमंत्री देत नाही. त्यांना मोठा भ्रष्टाचार करायचा आहे, असा आरोप देखील सूर्यवंशी यांनी पत्रकार परिषदेत केला. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, खा. संजय राऊत यांनी कोअर कमिटीसह सर्वांना विश्वासात घेऊन तीन महिन्यापूर्वी नवीन कार्यकारिणी जाहीर केली. मात्र या कार्यकारिणीवर आताच कशी नाराजी व्यक्त होत आहे. आजवर एकाही पदाधिकाऱ्यांने त्यांची नाराजी कुठेही बोलून दाखवली नाही. याउलट पक्षाचा निर्धार मेळावा सर्वांनी यशस्वी करुन दाखवला,असेही सूर्यवंशी यांनी सांगितले.

### आठ ते दहा जणांवर संशयाची सुई

शिवसेना ठाकरे गटात आणखी आठ ते दहा जणांच्या पक्षांतराची चर्चा आहे. उपनेते सुनील बागूल, माजी महापौर अशोक मुर्तडक, माजी नगरसेविका हर्षा बडगुजर, केशव पोरजे, देवानंद बिरारी आदींवर संशयाची सुई आहे. अर्थात या सर्वांनी असे काही नसल्याचे स्पष्ट केले. मी बिलकुल नाराज नसून शिवसेना सोडण्याचा विचारही नसल्याचे सुनील बागूल यांनी सांगितले, तर नाराज व्हायचे कारणच नाही, असे बिरारी यांनी सांगितले. आम्ही मरेपर्यंत उध्दव ठाकरे यांच्यासोबतच राहणार असा निर्वाळा माजी नगरसेवक केशव पोरजे यांनी दिला.

### मी नंतर बोलेल : विलास शिंदे

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेला महानगरप्रमुख विलास शिंदे देखील उपस्थित होते. ते देखील पक्षात नाराज असल्याची चर्चा आहे. ज्यावेळेस सुधाकर बडगुजर यांना जिल्हाप्रमुख करण्यात आले होते. त्यावेळेस माझी इच्छा होती, मात्र आमचा पक्ष आदेशावर चालणारा पक्ष असून त्यांची नियुक्ती झाल्यानंतर आम्ही सर्वांनी एक दिल्याने कामाला सुरुवात केली. आता माझ्याबाबत चर्चा असल्याने मी माझे स्पष्ट मत स्वतंत्ररित्या मांडणार. आज जिल्हाप्रमुखांची पत्रकार परिषद आहे. त्यामुळे ते सर्व प्रश्नांची उत्तरे देतील असे शिंदे म्हणाले. त्यामुळे शिंदे यांच्याबाबत आणखी संशय वाढला. दरम्यात ते लवकरच पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांची भेट घेणार असून त्यानंतर आपली भुमिका स्पष्ट करणार आहे.

### पक्ष कारवाई अनपेक्षित : बडगुजर



**नवीन नाशिक ।** पक्षाने अचानक शिस्तभंगाची कारवाई केल्यानंतर सुधाकर बडगुजर यांनी सायंकाळी पत्रकारांशी संवाद साधत आपली भूमिका स्पष्ट केली. त्यांनी सध्या मी कुठलाही निर्णय घेतलेला नाही असे सांगत संजय राऊत आणि पक्ष नेतृत्वावर अप्रत्यक्ष नाराजी व्यक्त केली.

यावेळी जिल्हाप्रमुख पदाबाबत मत व्यक्त करताना बडगुजर म्हणाले की, डी. जी. सूर्यवंशी यांना जिल्हाप्रमुख पद देण्यापेक्षा विलास शिंदे यांना संधी दिली असती तर अधिक योग्य ठरले असते. संजय राऊत यांनी त्यांना पाठवलेला मेसेज फोनवरून उपस्थित पत्रकारांना दाखवत त्यांनी आपली भूमिका बळकट केली. मुख्यमंत्र्यांशी झालेली भेट कोणत्याही राजकीय हेतूने नव्हती, ती फक्त कामकाजाच्या अनुषंगाने होती, असे त्यांनी स्पष्ट केले. मी पक्षश्रेष्ठींवर अथवा स्थानिक नेतृत्वावर नाराज नाही. मी मंत्री गिरीश महाजन यांच्या शेजारी उभा होतो, म्हणून संजय राऊत यांनी नाराजी व्यक्त केली. मात्र त्याचवेळी अरविंद सावंत देखील उपस्थित होते, मग त्यांच्याबाबत काय? असा सवालही बडगुजर यांनी यावेळी उपस्थित केला.

ते पुढे म्हणाले की, दोन दिवसांपूर्वीच माझा उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांच्याशी संवाद झाला होता. संजय राऊत जेव्हा नाशिक दौऱ्यावर आले होते, तेव्हा माझ्या गाडीतूनच ते शिर्डीला गेले. परंतु मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कर्मचाऱ्यांच्या मागण्या व मनपा भरती संदर्भात भेटल्याची माहिती त्यांना कळताच, राऊत यांनी माझ्या गाडीतून उतरून जिल्हाप्रमुखांच्या गाडीत बसणे पसंत केले. सध्या मी कुठलाही निर्णय घेतलेला नाही. योग्य वेळी निर्णय घेईन आणि माध्यमांद्वारे तो जाहीर करेन,असे बडगुजर यांनी स्पष्ट केले. यावेळी पत्रकार परिषदेला बडगुजर यांचे समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत आपला पाठिंबा दर्शविला. या संपूर्ण घटनेमुळे नाशिक जिल्ह्यात आगामी राजकीय हालचालींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सुधाकर बडगुजर यांचा मुंबई बॉम्बस्फोटातील दहशतवादी सलीम कुत्ताशी संबंध असल्याचे आरोप आहेत. स्व. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आज हयात असते तर त्यांनीही बडगुजर यांना शिवसेनेत ठेवले नसते. त्यामुळे, त्यांना शिवसेनेत प्रवेश देण्यास सर्व शिवसैनिकांचा विरोधच राहील.

■ प्रवीण तिदमे, महानगरप्रमुख, शिवसेना (शिंदे गट)

### खा. राऊत यांचे निकटवर्तीय अशी ओळख

नाशिकमधील शिवसेना ठाकरे गटाचे उपनेते सुधाकर बडगुजर हे नेते तथा खा. संजय राऊत यांचे निकटवर्तीय आहेत, अशी त्यांची ओळख आहे. बडगुजर यांनी नुकतीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. या भेटीवेळी त्यांनी सिंहस्थ कुंभमेळ्यापूर्वी महापालिकेतील रिक्त जागा भरण्याची मागणी केल्याचे सांगण्यात आले होते. विशेष म्हणजे संजय राऊत नाशिक दौऱ्यावर असतांना बडगुजर यांनी राऊत यांच्याऐवजी फडणवीस यांची भेट घेतल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या. बडगुजर हे भाजपात प्रवेश करणार असल्याची चर्चा रंगत असतानाच आज पक्षाने त्यांची हकालपट्टी केली. पक्षविरोधी कारवाया केल्याचा ठपका ठेवत हकालपट्टी झाली आहे. त्यांना पक्षाने दोन वेळा पश्चिम विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली होती. तर विविध पदे देखील दिली होती. सोमवारी नाशिकमध्ये खा. संजय राऊत असतानाच बडगुजरांनी मुख्यमंत्री फडणवीसांची भेट घेत धक्का दिला होता. तर त्याच दिवशी दुपारी महानगरप्रमुख विलास शिंदे यांच्या मुलीच्या विवाहास ठाकरेंचे कट्टर विरोधक उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हजेरी लावत दुसरा धक्का दिला होता. उपमुख्यमत्री शिंदे यांनी विलास शिंदे यांचे यावेळी कौतुक केले होते. त्यामुळे ठाकरे गटात मोठया उलथापालथीच्या चर्चा सुरु झाल्या होत्या. बडगुजर काही दिवसांपासून गिरीश महाजन यांच्याजवळ गेल्याचीही चर्चा आहे.

### आ. सीमा हिरेंचा विरोध

आमचे पक्षश्रेष्ठी सुज्ञ आहेत. त्यामुळे ते सुधाकर बडगुजरांसारख्या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीला भाजपमध्ये घेणार नाहीत, असे नाशिक पश्चिमच्या आ. सीमा हिरे यांनी माध्यमांशी बोलतांना सांगितले. आ. हिरे म्हणाल्या की,भाजप नेते नारायण राणे यांना भरल्या ताटावरून उठवून त्यांना अटक करण्यामागे बडगुजरांचा हात होता. त्यांची प्रतिमा मलिन आहे. देशद्रोही सलिम कुत्ता याच्यासोबतचे नाचतांना बडगुजरांचे व्हिडिओ माध्यमांवर व्हायरल झाले होते. निवडणुकीच्या काळात त्यांचे अनेक कारनामे समोर आले. त्यांच्यावर आतापर्यंत दाखल गुन्हे बघता त्यापासून बचावाकरिता ते भाजपमध्ये येऊ इच्छिता असे दिसून येत आहे. त्यांच्यावर होणारी कारवाई टाळण्याकरिता त्यांनी प्रवेश करण्याचे ठरवले असेल. आमचा त्यांच्या पक्ष प्रवेशाला विरोध आहे.

# परफेक्ट बिल्डकॉन चषक : मेरी क्रिकेट क्लबला जेतेपद

**नाशिक ।** परफेक्ट बिल्डकॉन प्रस्तुत क्रिडक अंडर-१४ समर क्रिकेट लीगचा उत्साहपूर्ण समारोप नाशिकमध्ये पार पडला. या लीगमुळे महाराष्ट्रभरातील युवा क्रिकेटपटूंना कौशल्य दाखवण्याची संधी मिळाली. स्पर्धेचे आयोजन क्रिडक स्पोर्टिंग एक्सलन्स अँड परफॉर्मन्स प्रायव्हेट लिमिटेडचे संस्थापक अध्यक्ष विनोद यादव यांनी केले.




१४ संघांच्या सहभागामुळे स्पर्धा अत्यंत रंगतदार ठरली. सुरुवातीला आर.व्ही. स्पोर्ट्स आणि क्रिडक ए यांच्यात उद्घाटनपर सामना झाला. तर मेरी क्रिकेट क्लब आणि नाशिक जिमखाना यांच्यात अंतिम सामना पार पडला. या अटीतटीच्या सामन्यात मेरी क्रिकेट क्लबने विजयी होऊन विजेतेपद पटकावले. विजेत्यांना परफेक्ट बिल्डकॉनचे संचालक अनिल आहेर, एनडीसीएचे सचिव समीर राखाटे, आणि नम्रता ॲडव्हर्टायझिंगचे मच्छिंद्र देशमुख यांच्या हस्ते विजेत्या संघाला चषक प्रदान करण्यात आले.

# मलाबार ग्रुपचा ‘हंगर फ्री वर्ल्ड’ उपक्रम

**नाशिक ।** जागतिक भूक दिनाचे औचित्य साधून मलाबार गोल्ड अँड डायमंड्स समूहातर्फे ‘हंगर फ्री वर्ल्ड’ मोहीम सुरू करण्यात आली आहे. सीएसआर उपक्रमांतर्गत गरजूंना दैनंदिन पौष्टिक जेवण पुरवण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.




दररोज ७० हजार लोकांना या उपक्रमांतर्गत जेवण दिले जात आहे. मलाबार ग्रुपने वार्षिक सीएसआर बजेटपैकी ६० टक्के रक्कम भूक आणि गरिबी निर्मूलनाच्या उद्देशाने उपक्रमांना समर्पित केली आहे. कंपनीने त्यांच्या सीएसआर उपक्रमांना चालना देण्यासाठी १५० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. दिल्ली येथे झालेल्या कार्यक्रमात अमिताभ कांत यांनी याची अधिकृत घोषणा केली. मलाबार ग्रुपचे अध्यक्ष एमपी अहमद, उपाध्यक्ष केपीअब्दुल सलाम, एमडी इंडिया ऑपरेशन्स ओ आशर, ग्रुप एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर अक निषाद आणि केपीवीरन कुट्टी, ग्रुप डायरेक्टर पी.ए.अब्दुल्ला इब्राहिम आदी यावेळी उपस्थित होते.

## अभीष्टचिंतन...



नामको बँकेच्या वतीने अध्यक्ष हेमंत धात्रक यांच्या वाढदिवसानिमित्ताने संस्थेच्या वतीने शाल, श्रीफळ देऊन धात्रक यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित माजी आमदार वसंत गिते, ज्येष्ठ नेते सोहनलाल भंडारी, विजय साने, अशोक सोनजे, ललित मोदी, रंजन ठाकरे, तानाजी जायभावे, गौतम सुराणा आदी.

## धनंजय मुंडेंचे मौन




**बीड ।** येथील प्रकरणामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार धनंजय मुंडे यांना त्यांचे मंत्रीपद गमवावे लागल्यानंतर त्यांनी विपश्यना केली. त्यानंतर एका खासगी धार्मिक कार्यक्रमासाठी ते बुधवारी नाशिकला आले यावेळी माध्यमांनी त्यांच्याशी संवाद साधला असता त्यांनी मौन बाळगून तेथून जाणे पसंत केले.

## जिल्हा रासायनिक खत उत्पादक, विक्रेते आढावा बैठक




**नाशिक ।** कृषी विभाग नाशिक आणि नाशिक ॲग्रो डिलर्स असोसिएशन यांच्या संयुक्तरित्या रासायनिक खते लिकिंग संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे रासायनिक खत उत्पादक कंपनी, घाऊक विक्रेते व किरकोळ विक्रेत्यांची बैठक संपन्न झाली. यावेळी नाडा व कृषी विभाग पदाधिकारी उपस्थित होते. रासायनिक खते कंपन्यांनी लिकिंग करू नये व किरकोळ विक्रेत्यांना रासायनिक खते लिकिंगसह घेऊ नये अश्या सूचना कृषी विभागाकडून देण्यात आल्या. रासायनिक खतांचे विभागनियाह समान वाटप व्हावे यासाठी कृषी विभागाने पुढाकार घेऊन रॅक चे वितरण करावे अशी विनंती नाशिक ॲग्रो डिलर्स मार्फत करण्यात आली. नाडाचे अध्यक्ष अरुण मुळाणे, ललित जाधव, बाळासाहेब जाधव, सचिन गिते यांनी लिकिंग संदर्भातले अडचणी कृषी विभागासमोर मांडल्या. बैठकीस संजय शेवाळे, उल्हा वेळे, डॉ. जगन सूर्यवंशी मंगेश तांबट, ललित जाधव, संतोष पाटील आदी उपस्थित होते.

## शब्दकोड :२६७



**आडवे शब्द** : १) राष्ट्राध्यक्ष. ४) घोडदळातील अधिकारी. ८) कूर्म, कच्छप. ११) चंद्र. १३) वेदनेने भरलेले. १५) हिंमत, साहस, धारिष्ट. १६) दिवश. १८) कोर्टातील खटला. २०) चाबूक. २१) जखमेवर जाड झालेली कातडी, गव्हाची एक जात. २२) बारा वर्षांचा काळ. २४) अंजनाचा एक प्रकार. २६) रोकड. २७) व्यवस्थित चालू असलेल्या कामात व्यत्यय आणणे (वा.प्र.).३०) हेलपाटा, यात्रेस जाणे. ३१) निकट, जवळ. ३२) माजा. ३४) सुसर. ३५) पलंग. ३६) रावणाने अपहरण केलेली. ३७) शंकराचे एक नाव. ३९) अडथळा. ४२) गणपतीचे एक नाव. ४४) अन्न जळणे. ४६) एकरूप ४९) तांदळाचा, खोबऱ्याचा चुरा घालून केलेला गोड पदार्थ. ५१) चंद्राची कड. ५२) पणजी राजधानी असलेले राज्य ५३) अडलेला, गरजू माणूस. ५७) रक्तवाहिनी. ५८) हाट. ६०) साहय्यक, मदत करणारा. ६१) चटकदार, रसाने भरलेले. ६४) फरारी, पळून गेलेला. ६६) रांजण. ६७) थेट, सरळ. ६८) बगल. ६९) म्हणीतील तीन पानांचे झाड.

**उभे शब्द** : १) राज्य काराभाराचे प्रमुख. २) घराचा मागचा दरवाजा. ३) तृतीया. ४) मज्ञाव, बंदी. ५) नाकावरील मोत्याचा दागिना. ६) इनाम, देणगी. ७) चेहऱ्यावरील तेज. ८) अक्षरापुढची उभी रेष. ९) मनाचा ग्रह, समज. १०) उम्र. १२) पाणी. १४) लोटी. १६) पूर्वज. १७) रुक्ष. १९) वाममार्गाचा आचरण करणारा. २०) दुसऱ्याने केलेल्या कामाचा आयता फायदा घेणारा (वा.प्र.). २३) बर्ड (मराठी)२४) समाधान, शांती, संतोष. २५) लेखणी. २६) एखाद्याच्या राजच्या कटकटीकडे लोक दुर्लक्ष करतात. (वा.प्र.). २८) शेतातील पेरणी वगैरे काम. २९) घामेजलेला. ३०) उत्तराधिकारी. ३३) अतिशय रागावणे. ३५) लोणच्यातील द्रव मसाला. ३८) शंकर ४०) सारख्या अंतरावर. ४१) पराभवाची माळ. ४३) दार. ४४) काळी मौना नावाचे बोर. ४५) पान. ४७) पाण्या अभावी करपलेला भाग. ४८) पातळसर. ५०) हिस्सा, वाटा. ५४) मोठी जाड तलवार. ५५) बोबडी वळणे. ५६) अफूचे बी. ५७) आकाश. ५९) मऊ पदार्थाचा आघात, चापट. ६२) सरळ वासा. ६३) शेवट, अखेर. ६५) रक्षा.

### शब्दकोड२६६चे उत्तर

